साक्षीदार क्र **०५** ची सरतपासणी
देवाची शपथ खरे सांगतो
नाव :–चंद्रभान नामदेव राऊत,
वय:–५३ वर्ष, व्यवसाय–शेती,
राह.पिपरा, ता.उमरेड, जि.नागपूर.

**सरतपासणी सरकारी वकील श्री.जे.एम.बोरकर यांच्या मार्फत शपथेवर सुरू.**

१. पोलिसांनी माझ्यासमक्ष कोणतेही जप्तीपंचनामे केले नाही. आता मला दोन जप्ती पंचनामे दाखविण्यात आले त्यावर माझ्या सह्या आहे. त्यातील मजकुर मला माहीती नाही. सहीपुरते अनुक्रमे **नि.क्र.४३ व ४४** देण्यात आले.

**सदर साक्षीदार अभियोग पक्षास कोणत्याही मुद्दयावर सहकार्य करीत नसल्याने त्यास उत्तरसुचक प्रश्न विचारण्याची परवानगी मागितली असता, परवानगी देण्यात येते.**

२. हे म्हणणे खरे नाही की, दि.१७/०९/२०१८ रोजी पोलिसांनी माझ्यासमक्ष देविदास रामदास मेंघरे यांच्या रक्ताच्या नमुन्याची बॉटल व जी फॉर्म जप्त केला होता व त्याप्रमाणे माझ्यासमक्ष जप्तीपंचनामे पोलिसांनी तयार केले व त्यानंतर मी त्यातील मजकूर वाचुन व समजुन त्यावर सह्या केल्या. हे म्हणणे खरे नाही की, दि.१७/०९/२०१८ रोजी पोलिसांनी माझ्यासमक्ष देविदास रामदास मेंघरे यांचा फुल बाहीचा पांढ–या गुलाबी रंगाचा शर्ट, एक पांढ–या रंगाचा शर्ट, एक पांढ–या रंगाची शांडो बनियान जप्त केली होती व त्याप्रमाणे माझ्यासमक्ष जप्तीपंचनामे पोलिसांनी तयार केले व त्यानंतर मी त्यातील मजकूर वाचुन व समजुन त्यावर सह्या केल्या. हे म्हणणे खरे नाही की, आजरोजी मी खोटी साक्ष देत आहे.

**सरतपास संपला.**

**आरोपीतर्फे ॲड.के.एस.चिंचघरे मॅडम यांनी उलटतपास नाकारला.**

**फेरतपास काही नाही.**

वा.दा.ब.अ.सा. समक्ष

(आर.एस.मानकर)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, उमरेड
दि२२/१२/२०२५

(आर.एस.मानकर)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
उमरेड